# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 200/2023 दिनांक : 22.05.2023

## 1)घरफोडी :-

**शिवाजीनगर :-** दिनांक 17.05.2023 रोजी चे 20.00 ते दि. 18.05.2023 चे 06.00 चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घर अरविंदनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे घरास कुलूप लावुन तिरूपती येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील एच पी कंपणीचा लॅपटॉप किंमती 10,000/-रूपये ॲपल कंपणीचा आयपॅड किंमती 15,000/-रूपये व सॅमसंग कंपणीचा टॅब किंमती 5,000/-रू असा एकुण 30,000/-रूपयाचा मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अजय पि. बळीराम वराडे, वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. अरविंदनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 153/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री घुगे , मो.क्रं 9284848994** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :-

**मुक्रामाबाद :-** दिनांक 20.05.2023 रोजी 02.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घराचे बाजुला मौ. राजुरा खु. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून यातील फिर्यादीने त्याचे शेळया घराचे बाजुला बांधुन झोपी गेले असता एक शेळी किंमती 10,000/-रूपयाची चोरून नेऊन देगलुर येथील व्यापाऱ्यास विक्री केले. वगैरे **फिर्यादी गणपत हुलवा भीमावाड, वय 50 वर्षे, रा. राजुरा खु. ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरन 124/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री ताहेर, मो. क्रं. 9823156052** हे करीत आहेत.

## 3)आत्महत्येस प्रवृत्त केले :-

**मुदखेड :-**दिनांक 18.05..2023 रोजी चे 11.00 वा. ते दि. 21.05.2023 चे 09.40 वा. चे दरम्यान, **मंगेश मगरे यांचे शेतात मौ. पिंपळकौठा मगरे ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सचिन दिगांबर पाकलवाड, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपळकौठा मगरे ता. मुदखेड जि. नांदेड** यास यातील आरोपीतांनी संगणमत करून उसने दिलेले 1,05,000/-रूपयाचे व्याज व मुददलासह एकुण पाच लाख रूपये दे म्हणुन वेळोवेळी प्रत्यक्ष तसेच फोनवर धमकी देवुन तगादा लाऊन गावात येवुन शिवीगाळ करून थापडा बुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीचे त्रासाला कंठाळुन यातील मयताने विषारी औषध पिऊन आत्महत्या केली. त्यांचे आत्महत्येस यातील आरोपी कारणीभुत झाले. वगैरे **फिर्यादी सुनिता सचिन पाकलवाड, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. पिंपळकौठा मगरे ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 114/2023 कलम 306, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री अशोक अनंत्रे, मो.नं. 9518945033** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :-

**इस्लापुर :-** 13.07.2016 ते आज पावेतो, **फर्यादीचे सासरी रा. तडाळा मिल जवळ ता. मुल जि. चंद्रपुर ह. मु. शिवनी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस कार घेण्यासाठी माहेरहुन दहा लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन तिला थापड बुक्यानी मारहाण करून तिचा वारंवार शारिरीक व मानसिक छळ करून क्रुर वागणुक देवुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 34 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 38/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री लुंगारे, मो.क्रं. 7774899822** हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवुन (शेतकरी आत्महत्या) :-

**उमरी :-**दिनांक 21.05.2023 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **मयताचे घरी मौ. सिंधी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शिवाजी दत्तराम गाढे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड,** यांनी शेतातील सततची नापिकीमुळे व ग्रामीण बँकेच्या कर्जास कंठाळुन स्वताचे घराचे छताचे हुकास दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार पांडुरंग दत्ताराम गाढे, वय 23 वर्षे, व्यवसाय शेती रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उमरी** आ. मृ. 17/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री करे, मो.नं. 7798354377** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 201/2023 दिनांक : 22.05.2023**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"महाराणा प्रतापसिंह"** यां महापुषांची जयंती साजरी

22 मे, 2023 सोमवार रोजी **"महाराणा प्रतापसिंह"** या महापुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शिवाजी लष्करे,** सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, सपोउपनि/सुर्यभान कागणे, मपोकॉ/शामका पवार, पोकॉ/विनांदे भंडारे यांनी उत्तम प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड